Telephone No. 0712-2701580 / 2700256 / 2744671 FAX No. 0712-2744489.

# GOVT. MEDICAL COLLEGE, NAGPUR.

# शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपुर.

क्रमांक : शावैमविना/विवि/बीपीएमटी/ 22846 /२०२१ दिनांक 26/११/२०२१.

विषय : सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षाकरीता (बीएस्सी-पीएमटी) अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची कट ऑफची तारीख वाढल्याबाबत

संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र क्रं. संवैशिवस/बीएस्सीइनपॅटे/प्रवेश/२०२०-२१/न.क्रं. ४९५(१ए)२०२१/१-अ, दि. ०७/०९/२०२१

२) संचालनालयाचे पत्र क्रं. संवैशिवस/बीपीएमटी/प्रवेश/२०२१-२२/न.क्रं.४९५/२०२१/१-अ, दि. १८/११/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने यासोबत जाहीर करण्यात येते की, मा. संचालक, वै.शि.व सं. , मुंबई यांचे संदर्भ क्रं. २ चे पत्रानुसार सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात बी.एस्सी.इन पॅरामेडिकल टेक्नोलॉजी (बीएस्सी-पीएमटी) अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रवेशाची कट ऑफ ची तारीख दि. १५/१२/२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.संदर्भ क्रं. १ नुसार पहील्या व दुस-याफेरीची प्रवेश प्रक्रिया दि. ३१ ऑक्टोंबर २०२१ रोजी संपुष्टात आलेली होती.त्या नंतर काही जागा रीक्त राहीलेल्या होत्या.सदर रीक्त जागांची विषय निहाय व संवर्ग निहाय माहीती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर च्या www.gmcnagpur.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी त्यांचे वरील संदर्भ क्रं. २ नुसार बी.एस्सी. पी.एम.टी. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता दि. १५/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.त्यामुळे बी. एस्सी. पी.एम.टी. या अभ्यासक्रमाच्या रीक्त जागांवर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्याकरीता दि. १५/१२/२०२१ पर्यंत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.सदर रीक्त जागांवरील प्रवेशाकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे माहे ऑक्टोंबर २०२१ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेची उपलब्ध असलेली गुणवत्ता यादी,नियम व शुल्क उपयोगात आणण्यात येणार आहे.

सदर गुणवत्ता यादी मधील ज्या विद्यार्थ्यांना यापुर्वी चे फेरीमध्ये प्रवेश मिळालेला नाही अश्या विद्यार्थ्यांच्या नावांचाच विचार नविन प्रवेश प्रक्रियेकरीता करण्यात येणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी माहे ऑक्टोंबर २०२१ च्या पहील्या किंवा दुस-या प्रवेश फेरीत निवड झालेली होती परंतु त्यांनी प्रवेश घेतला नव्हता असे विद्यार्थी या प्रवेश प्रक्रियेकरीता पात्र राहणार नाही.तसेच ज्या विद्यार्थ्यांनी माहे ऑक्टोंबर २०२१ च्या पहील्या किंवा दुस-या फेरीत प्रवेश घेतला असेल ते विद्यार्थी या नविन प्रक्रियेकरीता पात्र राहणार नाही.तसेच हे विद्यार्थी अपग्रेडेशन करीता सुदधा पात्र राहणार नाही.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**

| *विवरण* | *वेळापत्रक* |
|---|---|
| *तृतीय निवड यादी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर उपलब्ध* | *दि. ०२/१२/२०२१* |
| *तृतीय निवड यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची अंतिम तारीख* | *दि. ०८/१२/२०२१* |
| *स्पॉट निवड प्रक्रिया दि. १३/१२/२०२१ दु. २.३० वाजता ऑडीटोरीयम मध्ये* | |
| *विद्यार्थ्यांनी स्पॉट निवड प्रक्रियेकरीता रजिस्ट्रेशन करणे* | *दि. १३/१२/२०२१ दुपारी १२.३० ते २.३० पर्यंत* |
| *स्पॉट निवड प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची अंतिम तारीख* | *दि. १५/१२/२०२१ दुपारी ४.३० वाजपर्यंत* |
| *निवड प्रक्रियेची कट ऑफ डेट* | *१५/१२/२०२१* |

प्रस्तुत जाहीरातीमधील प्रवेश करीता उपलब्ध जागांचा तक्ता, अटी व शर्थी, शैक्षणिक शुल्क बाबतची माहीती या महाविद्यालयाच्या www.gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर नविन माहीती बघावी.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर.

Dean
Govt. Medical College,
Nagpur.

Dean Govt. Medical College ★ Nagpur ★